**बृहन्मुंबई महानगरपालिका**
**मध्यवर्ती खरेदी खाते**

## प्रस्तावना

माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 4 (1)(ब) च्या तरतुदीन्वये नागरिकांना उपलब्ध करुन द्यावयाची माहिती पुस्तिका

-: आदेशान्वये :-

परिपत्रक क्र. एमओएम/7578 दि.03.09.2005

**खाते: 'मध्यवर्ती खरेदी खाते', – बृहन्मुंबई महानगरपालिका**

**''माहितीचा अधिकार अधिनियम – 2005''**

1.1 केंद्र शासनाने शासकीय कार्यात पारदर्शकता आणण्याच्या हेतुने कार्यानुरुप निश्चित करण्यात आलेल्या जबाबदा-या तसेच महत्वाची माहिती जाणून घेण्याबाबतचा नागरिकांचा अधिकार मान्य केलेला असून त्याकरिता ''माहितीचा अधिकार अधिनियम–2005'' हा कायदा करण्यात आला आहे. सदरहु कायद्याच्या कलम 3 नुसार प्रत्येक नागरिकाला माहिती मिळविण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. महाराष्ट्र राज्य शासनाने दिनांक 21 जुलै 2005 रोजी अध्यादेश जारी केला आहे.

1.2 माहितीचा अधिकार अधिनियम – 2005' अंमलात आणण्याकरिता मुंबई महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. एमओएम / 7578 दि.03.09.2005 रोजी प्रस्तुत झालेल्या तसेच वेळोवेळी बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे पारित होणा-या परिपत्रकानुसार नागरिकांच्या माहितीकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकाच्या 'मध्यवर्ती खरेदी खात्याची रचना , कर्तव्ये, कार्यसूची, विविध कार्यपध्दती, निर्णय प्रक्रीया, अभिलेखाची सूची, लागू होणारे नियम, अधिनियम तसेच कर्मचारीवृंद याबाबतची माहिती नागरिकांसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.